INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February 2021

Special Issue 260 (B)

## Multidisciplinary Issue



**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**February 2021**

**Special Issue 260 (B)**

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo (Source) : Internet – NASA's Perseverance Rover successfully touched down on Mars on Thursday, 18th February 2021.**

**© All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 1000/-**

# Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh-** King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath-** Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar –** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue -260 (B) - Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2021

# INDEX


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | मांगेला समाज आणि बोली | प्रा. संदीप कदम | ०५ |
| ०२ | बौद्ध दर्शनाचा कर्मसिद्धान्त आणि योग दर्शनाचा कर्मसिद्धान्त-तुलनात्मक विवेचन | सुषमा कांबळे | ०९ |
| ०३ | गौतम बुद्धांच्या मराठी चरित्रातील मिथकांचे स्वरूप | डॉ.शिवाजी गायकवाड | १९ |
| ०४ | ज्ञानेश्वरीतील स्त्री दर्शन | श्री.संदीप तांबे, डॉ.शिरीष लांडगे पाटील | २२ |
| ०५ | लोकसंस्कृतीचा उपासक पोतराजाचे धार्मिक विधी | प्रा. माधवी पवार | २७ |
| ०६ | वेणास्वामींच्या स्फुट काव्यातील आत्मानुभूती | डॉ. सुरेश जाधव, सौ. शिल्पा शिवभक्त | ३२ |
| ०७ | मराठी ओवीगीतातील स्त्री चित्रण | डॉ. रामलीला पवार | ३७ |
| ०८ | वारकरी साहित्यातील 'समता' मूल्याचे दर्शन | श्री. जालिंदर येवले | ४२ |
| ०९ | लक्ष्मण महाराजांच्या अभंगातील नवविधा भक्ती | डॉ. प्रवीण कारंजकर | ४७ |
| १० | भटक्या विमुक्तांची जात -पंचायत व स्त्री प्रश्न | डॉ. अंजली मस्करेन्हस | ५३ |
| ११ | विश्वशांती व लोकसुधारणेची पाठशाळा : राष्ट्रसंतांची सामुदायिक प्रार्थना | डॉ. सतीश चहांदे | ५९ |
| १२ | डॉ. दिनकर गायकवाड यांच्या कवितेतील सामाजिकता | डॉ. सुनील निगडे | ६५ |
| १३ | प्रवासवर्णन वाङ्मयाचे स्वरूप | डॉ. गणपती मोरे | ६९ |
| १४ | 'अंतर्नाद' नियतकालिकाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये | श्री. शरद दुधाट | ७१ |
| १५ | महात्मा गांधी यांच्या शिक्षणविषयक विचारांची ज्वलंत प्रासंगिकता | डॉ. जी.डी. घोडे | ७८ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य | डॉ. लता आंदे | ८३ |
| १७ | हमीद दलवाई यांचे मुस्लीम स्त्री सुधारक कार्य | डॉ. संदीप राऊत | ८८ |
| १८ | नामदेव ढसाळांच्या 'निर्वाणा अगोदरची पीडा' कवितासंग्रहातून व्यक्त झालेल्या जाणीवा : एक चिकित्सा | प्रा. सुरेश वर्धे | ९३ |
| १९ | समकालीन जीवन व्यवहार आणि भाषेचे बदलते स्वरूप | डॉ. गजानन भामरे | १०६ |
| २० | 'हंडाभर चांदण्या' आणि ग्रामीण वास्तव | डॉ. विजय केसकर | १०९ |
| २१ | मराठी नाटकातील : जीवन संदर्भ काही निरीक्षणे | प्रा. आर. डी. कांबळे | ११४ |
| २२ | तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती | डॉ. सुवर्णा गाडगे | ११९ |
| २३ | निवडक दलित कथेतील सामाजिक व वाङ्मयीन जाणिवा | डॉ.के.के. अहिरे, प्रा.अरुण मोरे | १२५ |
| २४ | दलित आत्मकथन : दु:खद जीवनाचा आलेख | प्रा. काशिनाथ तरासे | १२९ |
| २५ | व्यक्तिमत्त्व विकासासाठी संभाषण व लेखन कौशल्ये | डॉ. धनराज धनगर | १३५ |
| २६ | क्रांतिसिंह नाना पाटील यांचे 'प्रतिसरकार' : एक अभिनव प्रयोग | डॉ. राजू सावंत | १४० |
| २७ | मराठेकालीन दुष्काळ व त्यावरील उपाययोजना | प्रा. आर. के. सूर्यवंशी | १४६ |

| | | |
|---|---|---|
| २८ | इ.स.१८५७ च्या उठावात खानदेशचा सहभाग **प्रा.जगन्नाथ गोपाळ** | १५० |
| २९ | म. गांधीजींचा जळगाव जिल्ह्यातील जनतेवरील प्रभाव (सन १९२० ते १९४७) **डॉ. बाळकृष्ण पाटील** | १५४ |
| ३० | आदिवासी विद्यार्थ्यांना गणितविषयाच्या अध्ययनात साहित्य हाताळताना येणाऱ्या अडचणी शोधून केलेल्या उपाययोजनांचा संपादणुकीवर होणाऱ्या परीणामांचा अभ्यास **प्रा. सौ. व्ही. व्ही. बाविस्कर** | १६७ |
| ३१ | नागपूर जिल्ह्यातील मराठी दैनिकांच्या ग्रामीण वार्ताहरांची शैक्षणिक स्थिती **गणेश खवसे** | १७२ |
| ३२ | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी पत संस्थांच्या पुनर्प्राप्तीची कामगिरी एक : चिकित्सक अभ्यास **पी. ए. दीक्षित, प्रा. डॉ. ए. आर. मुंगी, प्रा. डॉ. ए. वाय. दीक्षित** | १७५ |
| ३३ | ग्रंथालयात माहितीचे व्यवस्थापन **डॉ. प्रशांत पगाडे** | १८६ |
| ३४ | ग्रंथालय सुरक्षा : काल, आज आणि उद्या **प्रा. तुळजाराम खैरे** | १९० |
| ३५ | प्राथमिक शाळांमधील दुर्गम भागातील मातांच्या सामाजिक, आर्थिक- स्थितीचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास **डॉ. श्रीमती व्ही.व्ही. बाविस्कर** | १९४ |
| ३६ | कन्नड सक्ती व महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्य **डॉ. एस. एन. कांबळे** | २०० |
| ३७ | भंडारा जिल्ह्यातील तांदूळ पिकाच्या उत्पादकतेचे (कृषी कार्यक्षमतेचे) भौगोलिक अध्ययन **प्रा. हरिचंद्र कैताडे, डॉ. मेघा सावरकर** | २०३ |
| ३८ | कोविड-१९ चा भारतीय शेतीवरील परिणाम **डॉ. विजय शिंदे** | २१० |
| ३९ | कोविड-१९ मुळे भारतातील आर्थिक सामाजिक व राजकीय कारणांचा गरीब कुटुंबातील खेळाडूंच्या आरोग्यावर आणि खेळावर झालेला परिणाम एक अभ्यास **डॉ. गुणाजी नलगे** | २१५ |
| ४० | मराठी दैनिकांच्या ग्रामीण वार्ताहरांची आर्थिक, सामाजिक स्थिती (नागपूर जिल्हा) **गणेश खवसे** | २१९ |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

E-ISSN : 2348-7143
February 2021

# व्यक्तिमत्त्व विकासासाठी संभाषण व लेखन कौशल्ये

**डॉ. धनराज धनगर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित
कला आणि वाणिज्य महाविद्यालय, येवला
मो. ७७७५९८२५३४

कोणतीही व्यक्ती ही सुशिक्षित आहे किंवा अशिक्षित आहे हे ओळखायचं असेल तर त्याच्या बोलण्यावरून ते सहज ओळखता येऊ शकते. व्यक्तीचा पेहराव व्यवसायानुसार बदलतो, त्यामुळे पेहरावावरून व्यक्ती सुशिक्षित आहे किंवा अशिक्षित आहे हे ओळखता येत नाही. पण संभाषण व लेखन कौशल्य यावरून त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व सहज ओळखता येते. त्यामुळेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासात संभाषण व लेखन कौशल्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही गरज लक्षात घेऊन विद्यापीठीय पातळीवर तयार होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमांमध्ये उपयोजित मराठीचा व त्या अनुषंगाने भाषा कौशल्यांचा समावेश होतांना आपणास दिसतो. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल या स्वरूपाची अनेक पुस्तके देखील बाजारात येताना दिसतात. ही पुस्तके मार्गदर्शक स्वरूपात असली तरीही ही गुणवत्तेच्या बाबतीत सरस असतीलच असे मात्र नसते. मात्र नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाने संपादित केलेले 'व्यक्तिमत्त्व विकासासाठी संभाषण व लेखन कौशल्य' हे पुस्तक मात्र उल्लेखनीय म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांसोबतच विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना, तसेच भाषिक कौशल्यांविषयी अधिक जाणून घेऊन स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला मार्गदर्शक ठरेल असेच हे पुस्तक आहे.

हे पुस्तक केवळ विद्यापीठातील तज्ज्ञांनी संपादित केले आहे म्हणून महत्त्वाचे म्हटले पाहिजे असे नाही तर त्या त्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्त्वाची छाप असलेल्या महानुभावांचे अनुभवकथन व स्व-अनुभवातून त्यानी केलेले मार्गदर्शन यामुळे हे पुस्तक विशेष महत्त्वाचे म्हणावे लागेल.

"सध्याच्या काळात या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित करताना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. केशव सखाराम देशमुख म्हणतात, "खरे तर मराठी भाषेचे उपयोजन बहुमितीय अशा पद्धतीने लक्षात घ्यावयाच्या हा काळ असून त्यास अनुसरून अभ्यासक्रमांची वेगळी आखणी करता येणारी असते कारण आज विविध क्षेत्रांमध्ये विविध संधी उपलब्ध आहेत. त्या संधीचे लाभ घ्यावयाची असतील तर आमच्या भाषेत शिक्षणातून नवनवी कौशल्यं शिकता शिकता यायला हवीत. ज्यातून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण होईल. त्यांच्यामध्ये एक प्रकारे समाधान वाढीस लागेल. म्हणूनच मराठी भाषिक कौशल्यांचा विचार या पद्धतीने करण्याचा प्रयत्न मराठी अभ्यास मंडळाने येथे केला आणि त्यातून हे संपादित पुस्तक सिद्ध झाले."[१] अभ्यासक्रमाच्या निर्मितीमागील भूमिका व्यक्त करताना सध्याच्या काळात भाषेच्या उपयोजित शिक्षणाकडे डॉ. केशव सखाराम देशमुख यांनी येथे लक्ष वेधलेले दिसते. मराठी चा अभ्यासक्रम तयार करताना किंवा कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना भाषेच्या कौशाल्याधारित स्वरूपावर लक्ष दिले गेल्यास भाषा आणि साहित्याचा अभ्यासक्रम कालबाह्य किंवा निरुपयोगी ठरणार नाही शिवाय ते काळ सुसंगत ठरणारे आहे. परंतु केवळ चांगला अभ्यासक्रम निर्माण होऊन भागात नसते तर तो अभ्यासक्रम शिकविण्यासाठी तज्ञ शिक्षक असावे लागतात. या तज्ञ शिक्षकाना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरू शकतील असे संदर्भ ग्रंथदेखील असावे लागतात. प्रस्तुत विद्यापीठातील मराठी विषयाचा कौशाल्याधारीत अभ्यासक्रमासाठीचे असे संदर्भ पुस्तक संपादित करण्याचे शिधनुष्य डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. शैलेन्द्र लेंडे आणि डॉ. वंदना महाजन या संपादक त्रयींनी यशस्वीपणे पेललेले आहे असे या पुस्तकाचे स्वरूप पाहता आपल्या लक्षात येते.

या पुस्तकात वर म्हटल्या प्रमाणे आपापल्या क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केलेल्या लेखकांनी यातील लेख लिहिले आहेत. एकूण ८ प्रकरणांमध्ये असलेल्या या पुस्तकातील पहिले प्रकरण डॉ. राजेंद्र थोरात यांनी लिहिलेले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट संपादनासाठीचा पुरस्कार मिळालेले डॉ. राजेंद्र

थोरात हे संत साहित्य, चित्रपट आणि प्रसारमाध्यमे या विषयाचे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. 'संभाषण कौशल्य' या प्रस्तुत पुस्तकातील पहिल्या प्रकरणात त्यानी संवाद, संभाषण या संकल्पनांची ओळख करून दिलेली असून, संभाषणाचे प्रकार - प्रत्यक्ष संभाषण, अप्रत्यक्ष संभाषण, औपचारिक संभाषण, अनौपचारिक संभाषण, निवेदन, वक्तृत्व या अनुषंगाने संवाद कौशल्याचे स्वरूपावर प्रकाश टाकलेला आहे. त्याचबरोबर आधुनिक समाजमाध्यमांचा वापर या अनुषंगाने त्यानी अभ्यासपूर्ण मांडणी केलेली असून प्रत्यक्ष उदाहरण-दाखले यांच्या माध्यमातून संवाद कौशल्ये विकसित होण्यासाठी नेमके काय काय करावे लागेल? याची सांगोपांग माहिती त्यांनी करून दिलेली आहे. त्याचबरोबर आधुनिक समाज माध्यमे उदाहरणार्थ – फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप, ट्विटर, युट्युब, स्काईप इत्यादी एप्लिकेशन्सचा परिचय देखील त्यांनी करून दिलेला आहे. संवाद कौशल्यांना आत्मसात केल्यावर नेमक्या रोजगाराच्या कोणत्या संधी उपलब्ध होऊ शकतात याविषयी देखील त्यानी मार्गदर्शन केले आहे.

प्रस्तुत पुस्तकातील दुसरे प्रकरण हे 'सूत्रसंचालन' या विषयावर असून प्रतिभा जतिन कदम आणि जतिन रमेश कदम या व्यावसायिक सूत्रसंचालक पती-पत्नीनी ते स्वानुभवातून लिहिलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांना सूत्रसंचालनासाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. सूत्रसंचालन, निवेदन व उद्घोषणा यातील साम्य व फरक प्रस्तुत प्रकरणातून स्पष्ट केलेला असून सूत्रसंचालनाची व्याप्ती, उत्कृष्ट सूत्रसंचालकाची गुणवैशिष्ट्ये, सूत्रसंचालकाने पाळावयाची पथ्ये, माईक समोर कसे उभे राहावे? सूत्रसंचालकाने माईक टेस्टिंग कसे करावे? कार्यक्रम पत्रिकेनुसार व कार्यक्रमाच्या रूपरेषेनुसार सूत्रसंचालन कसे असावे? सूत्रसंचालन करताना सूत्रसंचालकांना येणाऱ्या तांत्रिक अडथळयांची माहिती त्यातील खाच-खळग्यांसह त्यानी दिलेली आहे. प्रसारमाध्यमांच्या समोर सूत्रसंचालन करताना घ्यावयाची काळजी, कॅमेऱ्याला सामोरे जाताना सूत्रसंचालकाने घ्यावयाची काळजी, सूत्रसंचालनाचे इव्हेंट मॅनेजमेंट, उत्कृष्ट सूत्रसंचालनासाठी आवश्यक मानसिकता आदी संदर्भात सोदाहरण व सविस्तर मार्गदर्शन केलेले आढळते.

प्रस्तुत पुस्तकातील तिसरे प्रकरण 'मुलाखत' या विषयावरील असून डॉ. शैलेश त्रिभुवन आणि प्रा. रविंद्र बेंम्बरे या प्राध्यापक द्वयींनी ते लिहिले आहे. मुलाखत या तंत्राविषयी माहिती देताना मुलाखत देणे आणि मुलाखत घेणे या दोन्ही अंगाने विचार केलेला आहे. मुलाखतीची तयारी कशी करावी? विविध प्रसारमाध्यमांसाठी मुलाखत देताना आणि मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी, सभा-संमेलनात मुलाखत घेताना मुलाखतकाराने पाळावयाचे संकेत आदी संदर्भात खूपच उपयुक्त असणारी माहिती प्रस्तुत प्रकरणातून आलेली असून दिग्गज व्यक्तीची मुलाखत घेताना दडपण येऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी? मुलाखत घेणाऱ्याचा व देणाऱ्याचा हजरजबाबीपणा, त्यासाठीची बहुश्रुतता यासह तपशीलवार मार्गदर्शन आहे.

या पुस्तकातील चौथे प्रकरण 'वक्तृत्व' कौशल्याच्या विकासासंदर्भातील असून 'वक्तृत्व' या संकल्पनेचा ग्रीक वसाहतीपासून झालेला उदय, जागतिक स्तरावरील नामवंत वक्ते, संत ज्ञानेश्वर आणि प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी केलेल्या वक्तृत्वाच्या व्याख्या, श्रोत्यांचा अनुनय, वक्तृत्व शास्त्र की कला? या विषयाची चर्चा वक्तृत्वाच्या स्वरूपावर प्रकाश टाकणारी आहे. बोलणे आणि वक्तृत्व यातील फरक स्पष्ट करून वक्तृत्व या प्रयत्नसाध्य कलेतील कलावंताकडे अष्टपैलू वक्तृत्वपटूचे कोणते गुण आवश्यक आहेत? ते गुण विकसित करण्यासाठी नेमके काय केले पाहिजे? यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. वाक्तृत्त्व प्रसंगी आवाजातील चढ-उतार, बलाघात, देहबोली या संदर्भाने सविस्तर मार्गदर्शन केलेले असून भाषणाला जाताना वक्त्याने कोणती काळजी घ्यावी? व्याख्यानाचे टप्पे कसे करावेत? याविषयी मौलिक मार्गदर्शन आहे. 'वक्ता दससहस्त्रेषु' या शब्दात वक्तृत्त्व कलेचे महत्त्व विशद केलेले असून चौसष्ट कलांपैकी एक असणारी 'वक्तृत्व कला' प्रभावीपणे आत्मसात करण्यासाठी हे मार्गदर्शन निश्चितच उपयोगी ठरणारे म्हणावे लागेल.

E-ISSN :
2348-7143
February 2021

प्रस्तुत पुस्तकातील पाचवे प्रकरण 'लेखन कौशल्य' विकासासंदर्भात असून प्रतीक्षा तालंगकर-कथले यांनी 'लेखन कौशल्या'ची स्वरूप वैशिष्ट्ये सोदाहरण सांगितलेली आहेत. लेखनकौशल्यांची उद्दिष्टे सांगताना विचारांचे प्रकटीकरण, विचारांचा प्रसार, समाजावर सुसंस्कार करणे, संस्कृतीचे जतन आणि संवर्धन, मानसिक समाधानासाठीचे लेखन ही उद्दिष्टे त्यांनी सांगितलेली आहेत. ही उद्दिष्ट्ये डोळयांपुढे ठेऊन लेखनकौशल्ये आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांमधून उद्याचे चांगले लेखक, विचारवंत घडतील यात शंका वाटत नाही. लेखन कौशल्याचे टप्पे सांगताना सुवाच्च, वळणदार हस्ताक्षराचे महत्त्व, लेखनातील शुद्धलेखनाचे महत्व, विविध लेखन प्रकारानुसार लेखन करताना घ्यावयाची काळजी, लेखनाचे प्रकार – अनुलेखन, श्रुतलेखन, दृकलेखन, गतीलेखन, अभिव्यक्त लेखन, जाहिरात लेखन असे विविध लेखनाचे प्रकार त्यानी सांगितलेले आहेत. प्रसारमाध्यमांसाठी जाहिरात लेखन करताना घ्यावयाची दक्षता, वर्तमानपत्राच्या जाहिरात लेखनातील रचनातंत्र, आकाशवाणीसाठीचे संहितालेखन, दूरचित्रवाणीसाठी जाहिरात लेखन, संवाद लेखनाचे स्वरूप, संवाद लेखन करताना घ्यावयाची दक्षता, इतिवृत्त लेखनाचे स्वरूप, रचनातंत्र, इतिवृत्त लेखन करताना घ्यावयाची दक्षता, पत्रलेखनाचे प्रकार, पत्रलेखन करताना घ्यायची दक्षता, टिप्पणी लेखनाचे स्वरूप व रचना तंत्र, आधुनिक समाज माध्यमांवर ब्लॉग लेखन करताना घ्यावयाची काळजी, ब्लॉग निर्मिती करण्याचे टप्पे, ब्लॉक चे प्रकार, भाषांतर व भाषांतराचे प्रकार, ग्रंथ परीक्षण लेखनाचे रचनातंत्र, मुलाखत लेखनाचे रचनातंत्र, मुलाखत लेखन करताना घ्यावयाची दक्षता, विविध माध्यमांसाठी बातमी लेखन करताना आत्मसात करावे लागणारे कौशल्ये, बातमीच्या निवडीचे निकष, बातमी लेखन करताना घ्यावयाची काळजी, लेखन कौशल्यांचे जीवनातील महत्त्व व व्यावसायिक संधी, लेखन कौशल्यातील प्रमाण भाषेचे स्वरूप, प्रमाण लेखनाचे नियम, विरामचिन्हांचा तक्ता, मुद्रित शोधन करताना वापरल्या जाणाऱ्या खुणा आदि संदर्भात सविस्तर व सचित्र माहिती प्रस्तुत प्रकरणात देण्यात आलेली आहे. लेखन कौशल्यांच्या संदर्भात विविधांगी पैलू व्यक्तीमत्वाला पाडणारे, सविस्तर आणि सखोल मार्गदर्शन करणारे हे प्रकरण लेखन कौशल्य विकासासाठी खूपच महत्त्वाचे म्हणावे लागेल.

RESEARCH JOURNEY

प्रस्तुत पुस्तकातील सहावे प्रकरण 'संवाद लेखन' हे असून प्रसिद्ध नाटककार, चित्रपट निर्माते, लेखक-दिग्दर्शक राजकुमार तांगडे यांनी संवाद लेखनासाठी आवश्यक सृजनशील विचार, चिंतनशीलता आदी संदर्भात सविस्तर व सोदाहरण मार्गदर्शन केलेले आहे. आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी यातील संवाद लेखन यातील मूलभूत फरक स्पष्ट करून त्यातील बारकावे त्यानी सोदाहरण सांगितले आहे. त्यांचे स्वानुभवकथन असंरे हे प्रकरण विद्यार्थ्यांना व या पुस्तकाच्या वाचकांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल असेच आहे. संवाद ही एक कला आहे तसेच तो एक संस्कार आहे हे त्यांचे प्रतिपादन संवाद कौशल्ये आत्मसात करू इच्छिणाऱ्यानी ध्यानात घेतल्यास या संवाद कौशल्याचे महत्त्व आणि श्रेष्ठता समजून घेता येईल.

प्रस्तुत पुस्तकातील सातवे प्रकरण हे कवी, चित्रकार, जाहिरात लेखक व पुणे येथील अभिनव कला महाविद्यालयातील प्राध्यापक रवि पवार यांनी लिहिलेले आहे. 'जाहिरात लेखन' विषयी प्रस्तुत प्रकरणातून त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. साहित्य लेखन आणि जाहिरात लेखन यातील साम्य-भेद यावर प्रकाश टाकून जाहिरात लेखनासाठी आवश्यक सर्जनशीलतेची, सर्जक विचार प्रक्रियेची आवश्यकता, आकलन क्षमता त्यानी स्पष्ट करून सांगितली आहे. जाहिरात धोरणामागील कल्पक व्यूहरचना, जाहिरातीतील दृश्य संकल्पना आणि त्या अनुषंगाने असणारे सर्जनशील लेखन, जाहिराती मागील अनन्य विक्री लक्षण व त्या अनुषंगाने केली जाणारी रचना, जाहिरात लेखनामागे असणाऱ्या मानवी रुचीच्या मागणीचा प्रकार या संदर्भात खूपच सखोल मांडणी त्यानी केलेली असून जाहिरात लेखनाचे मूळ घटक, जाहिरातीच्या शीर्षका संदर्भातील निवड, जाहिरातीचे प्रकार आणि कॉपी, इलेस्ट्रेशन, टाइपोग्रफी, फोटोग्राफी, जाहिरातीतील घोषवाक्य संकल्पना आदी

E-ISSN : 2348-7143
February 2021

संदर्भात सोदाहरण व सखोल मार्गदर्शक चर्चा केलेली आहे. कल्पक लेखकांना जाहिरात क्षेत्रात असणाऱ्या संधी, जाहिरात क्षेत्रातील सर्जनशीलतेच्या कक्षा आणि जाहिरात लेखन हा एक छंद, आवड म्हणून असणारा आनंददायी व्यवसाय याविषयीही चर्चा केलेली आहे.

प्रस्तुत पुस्तकातील शेवटचे व आठवे प्रकरण ‘ख्वाडा’, ‘बबन’, ‘छत्रपती शासन’, ‘चिवटी’ या चित्रपटांसाठी गीते लिहिणाऱ्या प्रसिद्ध गीतकार कवी विनायक पवार यांनी गीत लेखना संदर्भात मार्गदर्शन करणारे प्रकरण आहे. कविता लेखन आणि गीतलेखन यातील फरक स्पष्ट करून गीत लेखनातील तंत्र, दिग्दर्शक व गीतकार यातील परस्पर पूरकता, संगीतकार आणि गीतकार यांच्यातील सुसंवादातून निर्माण होणारे गीत, कथेला अनुषंगून गीत निर्मिती, गाणं आणि संगीत, गीतकाराला ‘राग’ संदर्भातील असणारे ज्ञान, लावणी, एकल गीत, करूण गीत, एटम सॉंग, निसर्ग गीत, विरह गीत, भक्ती गीत, शीर्षक गीत, प्रेमगीत, देशभक्तीपर गीत, डबिंग गीत, लोकगीत आदी गीतप्रकारांसंदर्भात त्यांनी माहिती दिलेली असून “या क्षेत्रात कुवत असेल तर आभाळाला कवेत घेण्याचे सामर्थ्य लाभते. चित्रपटक्षेत्रात पडद्यामागे खूप संधी आहेत. पारंपरिक नोकरीच्या चाकोरीपलीकडेही जग आहे. स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द बाळगली तर यश पायघड्या घालत येतं. स्वतःवर विश्वास असला तर जग काय म्हणते हे ऐकायला ही येणार नाही.”[२] असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठीची शब्दरचना त्यानी वापरली आहे. चित्रपट क्षेत्राच्या संदर्भात आणि त्या अनुषंगाने स्वप्न बघण्याच्या बाबतीत ते म्हणतात, “स्वप्न बघण्याचे बाबतीत आपल्यातील बरीच जण दारिद्र्यरेषेखाली आहेत असे मला सतत जाणवते. त्यातल्या त्यात शहरी मुलांपेक्षा ग्रामीण मुले अधिक स्वप्न दरिद्री असतात; हे प्रकर्षाने जाणवते. अर्थात सगळेच असे असतात असे नाही. आपले कुठे चुकत आहे तर आपण खूप सामान्य स्वप्न बघतो. स्वप्न सामान्य असले तर असामान्य कृती शक्य नाही.”[३] अशा पद्धतीने विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि चित्रपटासारखे क्षेत्र काबीज करावं या दृष्टिकोनातून या पुस्तकातील कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत जेणेकरून या स्वप्नांच्या दुनियेत त्यांना सहज वावर करणे शक्य होईल; असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ कवी, चित्रकार रवि पवार यांच्या सर्जनशीलतेतून साकारलेले आहे. मुखपृष्ठावर एक उघडलेलं पुस्तकाचे चित्र असून त्या पुस्तकाच्या मधून उडालेले पक्षी आकाशाला गवसणी घालणारे आहेत. गर्दीचे चित्र असून त्या गर्दीतून एक प्रतिमा सर्वसामान्यांपेक्षा उंच असणारी आहे; जी आभाळापर्यंत मोठी वाटते. अतिशय बोलके असणारे हे मुखपृष्ठ निश्चितच हजार शब्दांच्या बरोबरीचे म्हणावे लागेल. या पुस्तकातील आशयाशी संवादी असणारे मुखपृष्ठावरील चित्र जणू या पुस्तकातील संवाद व लेखन कौशल्ये आत्मसात केल्यावर व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आभाळाएवढे मोठे होऊ शकते, समृद्ध होऊ शकते, असामान्य ठरू शकते हेच दर्शविणारे आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर कवी फ. मु. शिंदे यांनी लिहिलेलं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे विद्यापीठ गीत असून पुस्तकातील सचित्र वर्णने व ठळक रकान्यातील ओळी वेधक आहेत हे या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अल्पावधीतच अथर्व पब्लिकेशन्सने पुस्तकाच्या बाह्य निर्मितीतही दर्जा निर्माण केला आहे हे यातून दिसते.

पुस्तकाच्या सुरुवातीला कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी दिलेला शुभेच्छा संदेश, प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्र सिंह बिसेन यांनी दिलेल्या शुभेच्छा, त्याचबरोबर मानव्यविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. भगवान जाधव यांनी दिलेला शुभेच्छा संदेश जोडलेला आहे. एकूणच या संदेशांमधून भाषा आणि साहित्याच्या नवीन स्वरूपाच्या अभ्यासक्रमातून कौशल्य शिक्षणाचा विचार व्यापक, मूल्यात्मक आणि परिवर्तनाला सामावून घेणारा ठरेल अशी अपेक्षा व्यक्त झालेली दिसते. डॉ. पृथ्वीराज तौर यांनी लिहिलेले संपादकीयदेखील यादृष्टीने खूपच बोलके आहे. मराठीचा कौशाल्याधारीत अभ्यासक्रम निर्मितीमागील अभ्यास मंडळाचा व्यापक दृष्टीकोन, त्या अनुषंगाने प्रस्तुत पुस्तकाच्या संपादनामागील भूमिका, मराठी विषय व तो घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या

E-ISSN : 2348-7143
February 2021

भविष्याविषयीची तळमळ व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या शब्दात शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी एकरूप होण्याच्या समर्पण भावनेचे प्रतिबिंब अधोरेखित करणारी आहे.

मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. केशव सखाराम देशमुख हे तर आपल्या अध्यक्षीय मनोगतात लिहितात, "भाषा येते, भाषा शिकली, एवढा विचार आज अपूर्ण मानला जाणारा. त्यापेक्षा भाषेची उपयुक्तता बहुपदरी, बहु कोनी, बहुआयामी असते; हे ओळखत भाषेतील अनेक कौशल्ये आपणास आत्मसात करता यायला हवीत. कारण हे जग आणि हा काळ त्याची मागणी करतो. या वेगवान काळात लिहिणे, बोलणे आणि त्यामधील प्रभावशीलता, त्यातील परिणामकारकता साध्य करता यायला हवी आणि ती साध्य करता येते. असे झाल्यास 'दुनिया मुठ्ठी में' आणावयास वेळ लागत नाही. मराठी भाषा लेखनकौशल्य विकास ही त्याचीच एक पायरी आहे. जी की महत्त्वाची संधी उपलब्ध करून देणारी, चाकोरी बाहेर जायला प्रोत्साहित करणारी अशी पायरी आहे. संवाद लेखन कौशल्यांमधून, जाहिरात लेखन कौशल्यांमधून, गीत लेखनाच्या कौशल्यामधून अथवा बहुआयामी अशा प्रकारच्या लेखन विषय कौशल्यांमधून विद्यार्थी नव्या संधी मिळवू शकतात, नवी झेप घेऊ शकतात. तशी दृष्टी या पुस्तकात नक्कीच आहे."[४] डॉ. केशव सखाराम देशमुख यांची ही पावती या पुस्तकाचं परिपूर्ण मूल्यमापन करणारी अशीच म्हणावी लागेल. मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्यांच्या ज्ञानाद्वारे आभाळाएवढे करण्याची क्षमता या पुस्तकात निश्चितच आहे.

**संदर्भ सूची :**

१. तौर (डॉ.) पृथ्वीराज, लेंडे (डॉ.) शैलेन्द्र, महाजन (डॉ.) वंदना (संपा.)-व्यक्तिमत्त्व विकासासाठी संभाषण व लेखन कौशल्ये, (अध्यक्षीय – डॉ. केशव सखाराम देशमुख), पृ. ८

२. तौर (डॉ.) पृथ्वीराज, लेंडे (डॉ.) शैलेन्द्र, महाजन (डॉ.) वंदना (संपा.)-व्यक्तिमत्त्व विकासासाठी संभाषण व लेखन कौशल्ये, (समाविष्ट लेख 'गीतलेखन'- विनायक पवार), पृ. १९७

३. तत्रैव, पृ. १८१

४. उ.नि., पृ. १०

RESEARCH JOURNEY